## प्रेसनोट

जा.क्र. २७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०४/२०१७

### भंडारा जिल्हयातील शहरी व ग्रामीन भागामध्ये सार्वजनिक ठिकाणी अवैध रित्या लावण्याात आलेले होर्डीग,पोस्टर्स काढुन घेणे बाबत.

मा. उच्च न्यायालय पीआयएल(जनहित याचिका) चे अनुषंगाने जिल्हयात शहरी / ग्रामीण भागामध्ये (विशेषत: नगर परिषद व नगरपंचायत) सन उत्सव महापुरूषांचे जंयती,जेष्ठ राजकीय व सामाजिक नेत्याचे वाढदिवस, निवडनुक प्रचारार्थ नेत्याचे पोस्टर्स,पक्षाचे बोर्ड, झेंडे व बॅनर्स इत्यादी सामाजिक कार्यकर्ते, राजकिय नेते मंडळी, संघटना प्रमुख यांचे कडुन शासकीय इमारती, सार्वजनिक खांब तसेच शासकीय जागेवर रितसर परवानगी न घेता अनाधिकृतपणे होर्डीग, पोस्टर्स, बॅनर, पताके, पक्षाचे बोर्ड, झेंडे व जाहीराती लावीत असतात.

सदरचे बॅनर / पोस्टर्स कोणीही कायकर्ते हे स्वत:चे मर्जीने उत्सवाचे समापन झाल्या नंतर काढत नाहीत. त्यामुळे एखादया वेळेस बॅनर/पताके हे जिर्ण होवुन फाटतात ज्यात बॅनर / झेंडे / महापुरूषांचे पोस्टर्स चा अपमान होवुन का. व. सु. चा प्रश्न निर्माण होतो. तरि सर्व सामान्य नागरीक, संघटना पुढारी, राजकिय जेष्ठ नेते, सामाजीक कार्यकर्ते यांनी मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे संबधित विभागाची परवानगी घेवुनच बॅनर/ पोस्टर्स / होर्डीग लावुन वेळेचे आत काढुन घ्यावेत जेने करून मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाचे उललंघन होणार नाही. विद्रुपीकरण थांबविण्यासाठी कायदयाची अंमलबजावणी करण्या करिता सर्वांनी सहकार्य करावे.

( विनीता साहू )
पोलीस अधिक्षक, भंडारा

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.